Scan QR code to visit... Epaper Portal

www. sahyandrinews.com

दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १४५ • Title - Code :- MAHMAR49513 • शनिवार दि.२४ फेब्रुवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.




# शरद पवार गटाला मिळाले 'तुतारीवाला माणूस' हे नवं चिन्ह

## केंद्रीय निवडणूक आयोगाची घोषणा;पर्याय दिलेले तिन्ही चिन्ह नाकारले

**मुंबई-शरद पवार यांच्या 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष - शरदचंद्र पवार' या पक्षाला आता 'तुतारीवाला माणूस' हे नवं निवडणूक चिन्ह मिळालं आहे. निवडणूक आयोगाने या संदर्भात गुरुवारी रात्री आदेश जारी केले. आदेशात म्हटले आहे की, पुढील आदेश येईपर्यंत व आगामी काळात येणाऱ्या निवडणुकीत शरद पवार गटाला 'तुतारी' हे चिन्ह वापरण्याचे आदेश दिले आहेत.**

काही दिवसांपूर्वी निवडणूक आयोगाने 'राष्ट्रवादी शरदचंद्र पवार' असे नाव दिले होते. त्यानंतर आता पक्षाला तुतारी वाजवणारा माणूस हे चिन्ह बहाल करण्यात आलं आहे. वटवृक्षासह अन्य दोन चिन्हांचा पर्याय शरद पवार गटाने मागितल्याची माहिती होती. पण आयोगाने तुतारीवाला माणूस हे चिन्ह दिले.या आधी केंद्रीय निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी पक्ष आणि चिन्ह हे अजित पवारांना बहाल केलं होतं. त्याविरोधात शरद पवार गटाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. आता सर्वोच्च न्यायालयाची यावर पुढचे निर्देश येईपर्यंत तुतारीवाला माणूस हेच शरद पवार गटाचे पक्षाचे चिन्ह असणार आहे. तुतारीवाला माणूस या चिन्हावर शरद पवार गटाला यापुढच्या निवडणुका लढवाव्या लागणार आहेत. सर्वोच्च न्यायालयात नुकत्याच झालेल्या सुनावणीनुसार शरद पवार गटाला चिन्हासाठी निवडणूक आयोगात अर्ज दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले होते. तसंच, अर्ज दाखल झाल्यानंतर निवडणूक आयोगाने आठवड्याभराच्या आत चिन्हाबाबत निर्णय देण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार, शरद पवार गटाने तीन पर्याय सुचवले होते. परंतु, त्यांनी दिलेल्या पर्यायांपैकी एकही चिन्ह केंद्रीय निवडणूक आयोगाने दिलं नाही. तर, निवडणूक आयोगाकडून तुतारी हे चिन्ह देण्यात आलं. सर्वोच्च न्यायालयाकडून पुढील आदेश येईपर्यंत तुतारी हे पक्षचिन्ह शरद पवार गटाकडे राहणार आहे.

**एक तुतारी द्या मज आणुनि**
**फुंकिन मी जी स्वप्राणाने**
**भेदुनि टाकिन सगळी गगने**

दीर्घ जिच्या त्या किंकाळीने अशी तुतारी द्या मजलागुनी! महाराष्ट्राच्या इतिहासात छत्रपती शिवरायांच्या शौर्याने ज्या तुतारीने दिल्लीच्या तख्ताच्याही कानठळ्या बसवल्या होत्या, तीच 'तुतारी' आज निवडणूक चिन्ह म्हणून निश्चित होणं ही 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष- शरदचंद्र पवार'साठी गौरवास्पद बाब आहे. महाराष्ट्राचं आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज, फुले, शाहू, आंबेडकरांच्या पुरोगामी विचारांनी, आदरणीय खा. शरदचंद्र पवार साहेबांच्या साथीने दिल्लीच्या तख्ताला हादरवून सोडण्यासाठी हीच 'तुतारी' पुन्हा एकदा रणशिंग फुंकण्याकरिता सज्ज आहे!

# देवळी व पुलगाव बाजार समिती मध्ये धान्याची आवक वाढली

**पुलगाव । प्रतिनिधी**

शेतमालाला अपेक्षित दर मिळत नसल्याने शेतकरी चिंताग्रस्त असताना अनेकांनी दरवाढीच्या प्रतीक्षेत आपला शेतमाल राखून ठेवला. आता आर्थिक गरज भागविण्याकरिता शेतमाल विक्रीस काढला, पुलगाव व देवळी या दोन्ही बाजार समितीत विक्रीकरिता येणाऱ्या शेतमालाची आवक कमालीची वाढली .

हिंगणघाट व अमरावती जिल्ह्यात विक्री करिता जाणारा शेतमाल आता स्थानिक बाजार समितीत विकल्या जातो आहे.शेतकऱ्यांचा विश्वास संपादन केल्यास आवक वाढेल, शेतकऱ्यांना वेळेवर शेतमालाचे चुकारे मिळाल्यास त्यांची आर्थिक गरज पूर्ण होईल .शेतमाल विक्रीकरिता घेऊन येणाऱ्या शेतकऱ्यांना अपेक्षित सुविधा उपलब्ध करून दिल्या तर शेतकरी आपल्या बाजार समितीत येतील व सोबत आणलेला शेतमाल विकतील या सर्व बाबी लक्षात घेऊन स्थानिक बाजार समितीचे सभापती मनोज वसू यांनी केलेल्या नियोजनाचा परिणाम आता दिसतो. पुलगाव बाजार समितीत आलेल्या शेतमालाकडे लक्ष केंद्रित केल्यास २० फेब्रुवारी पर्यंत १२६८५६ क्विंटल कापसाची आवक झाली .हा सर्व कापूस स्थानिक जिनिंग मध्ये खरेदी करण्यात आला .येथील बाजार समितीच्या यार्डवर २० फेब्रुवारी पर्यंत २९७० क्विंटल तूर व २६ हजार ०२५ क्विंटल सोयाबीन विक्रीकरिता आले. हा सर्व शेतमाल स्थानिक व्यापाऱ्यांनी खरेदी केला. देवळी बाजार समितीमध्ये यावर्षी कापसाची विक्रमी आवक झाली .तीन लाख ४ हजार ९२४.६७ क्विंटल कापूस विक्रीकरिता आला व स्थानिक जिनिंग मध्ये त्याची खरेदी करण्यात आली.१७ ४४ क्विंटल तूर व २६ २०९ . ९५ क्विंटल सोयाबीनची आवक झाली हा संपूर्ण शेतमाल स्थानिक व्यापाऱ्यांनी खरेदी केला आहे .२० फेब्रुवारी पर्यंत झालेली ही आवक असून येत्या पुढील काळात यापेक्षा अधिक शेतमालाची आवक होणे, अपेक्षित असल्याचे सभापती मनोज वसु यांच्याकडून सांगण्यात आले .विक्री झालेल्या शेतमालामुळे बाजार समितीला शेष रूपात मिळणारे उत्पन्न शेतकऱ्यांना सुविधा पुरविण्याकरिता वापरण्यात येणार आहे. यासोबतच बाजार समिती अंतर्गत काही नवीन योजना अंमलात आणल्या जाणार आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीने शेतमाल तारण योजना सुरू करून शेतकऱ्यांना दिलासा दिला . पूर्वी या भागातील शेतकरी आपला शेतमाल हिंगणघाट किंवा अमरावती जिल्ह्यातील धामणगाव ( रेल्वे) येथे विक्रीकरिता नेत होते. त्यामुळे त्यांना वाहतुकीचा अधिक खर्च करावा लागत होता .आता मात्र स्थानिक बाजार समितीवर शेतकऱ्यांनी विश्वास ठेवून शेतमाल विक्रीस आणणे सुरू केले. त्यामुळे शेतमालाची आवक ही वाढतीवर असल्याचे सभापती मनोज वसु यांनी दैनिक सह्याद्रीचा राखणदारशी बोलताना सांगितले.

# रेल्वे भाडे कपातीमुळे प्रवासी आनंदले

**पुलगाव । प्रतिनिधी**

दिनांक २२ फेब्रुवारी पासून रेल्वेचे प्रवासी भाडे कमी झाले. कोरोनाच्या काळात संपूर्ण देशात रेल्वे सेवा बंद करण्यात आली होती. कोरोना संपल्यानंतर हळूहळू जनजीवन सुरळीत झाल्यावर पॅसेंजर गाड्या रुळांवर धावू लागल्या. बंद पडलेल्या पॅसेंजर गाड्यांचे नाव बदलून एक्स्प्रेस मेमू असे करण्यात आले. ट्रेनचे भाडे जास्त आकारले जाऊ लागले.प्रवाश्यांच्या थांब्यावर दाखल झालेल्या मेमू एक्स्प्रेसचे भाडे जास्त आकारल्याने प्रवाशांमध्ये संतापाचे वातावरण होते .या दरम्यान महाराष्ट्रातील एसटी बसेसच्या भाड्यात भरघोस सवलत दिल्याने एसटी बसने प्रवास करण्याकडे लोकांचा कल होता.प्राधान्य म्हणून मिळाल्याने त्याचे दूरगामी परिणाम रेल्वेवर झाले.कोरोनापूर्वी पुलगाव ते वर्धा आणि धामणगावचे भाडे प्रति तिकीट १० होते.कोरोना नंतर भाडे ३० झाले. प्रवासी दीर्घ कालावधीनंतर रेल्वे प्रशासनाने प्रवासी भाड्यात शिथिलता दिली आहे.तिकीट दरात कपात केल्याने रेल्वे प्रवाशांमध्ये आनंदाचे




वातावरण निर्माण झाले आहे.

पुलगाव ते वर्धा ,नागपूर याच बाजूने शेकडो प्रवासी जात आहेत. पुलगाव ते धामणगाव चांदूर रेल्वे,बडनेरा,अमरावती.रेल्वे प्रशासनाने प्रवासी भाड्यात कपात केली.रेल्वे प्रवाशांना मोठा दिलासा.नागपूर भुसावळ नागपूर पॅसेंजर ट्रेन लवकर सुरु करण्याच्या स्थानिक परप्रांतीयांच्या या मागणीला आता जोर धरत आहे. दुसरीकडे एक्सप्रेस गाड्यांमध्ये सामान्य डबे कमी झाले असून भाडे जास्त असल्याने प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत.मेमू लोकल रेल्वे प्रशासनाने एक्स्प्रेसच्या भाड्यात भरघोस सवलत देण्याचा चांगला आणि योग्य निर्णय उशिरा का होईना पण घेतला .त्याचे स्वागत होत आहे. आणि रेल्वे प्रशासनाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# कला व विज्ञान महाविद्यालयात रोजगार संधी व मार्गदर्शन शिबीर




**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिक कला व विज्ञान महाविद्यालयच्या करिअर गायडन्स व प्लेसमेंट सेल तसेच जॉब मास्टर वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील आजी व माजी विद्यार्थ्यांसाठी तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांना रोजगारक्षम बनवण्याच्या उद्देशाने तसेच परिसरातील विविध कंपन्यांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने नुकताच करियर मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विलास हाडगे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून जॉब मास्टर वर्धा येथील प्रवीण जाधव उपस्थित होते. यावेळेस मंचावर समन्वयक डॉ. अशोक दवंडे, करिअर गायडन्स व प्लेसमेंट सेलचे समन्वयक डॉ. संदीप हातेवार तसेच जॉब मास्टर वर्धा च्या संचालिका ज्योती जाधव यादेखील उपस्थित होत्या.याप्रसंगी मार्गदर्शन करताना जॉब मास्टर्सचे संचालक प्रवीण जाधव यांनी विद्यार्थ्यांना बायोडाटा कसा लिहावा? स्वतःचे स्किल डेव्हलपमेंट कसे करावे? स्वतःचे मूल्यमापनाद्वारे परीक्षण करणे किती आवश्यक आहे याबाबत माहिती दिली. आपल्या अध्यक्षीय भाषणातून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही व्ही हाडगे यांनी रोजगार मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांना समर्पित असणे आवश्यक आहे असे सांगितले. याप्रसंगी डॉ. अशोक दवंडे डॉ. संदीप हातेवार तसेच ज्योती जाधव यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. सतीश चहांदे यांनी केले. मंच संचालन प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दीप्ती कडू यांनी केले तर आभार जीवरसायनशास्त्र विभाग प्रमुख प्रा. विवेक जेधे यांनी मानले.असंख्य विद्यार्थी उपस्थित असलेल्या या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी हिंदी विभाग प्रमुख डॉ. गजानन कदम, गणित विभाग प्रमुख प्रा. शकील खान तसेच भैय्यासाहेब भोयर औद्योगिक प्रशिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य कन्हैया पाटील तसेच शिक्षक अमोल वाघमारे, रवींद्र शिंगरू, अमित तुराळे यांचे अनमोल सहकार्य लाभले.




# हावडा अहमदाबाद एक्स्प्रेस व भुसावळ पॅसेंजर कधी सुरू होणार

पुलगाव : गेल्या अनेक वर्षांपासून येथील रेल्वेस्थानकावर थांबणाऱ्या अहमदाबाद -हावडा सुपरफास्ट एक्स्प्रेसला थांबा कधी मिळणार व नागपूर-भुसावळ पॅसेंजर कधी सुरू होणार असा प्रश्न देवळी तालुका पत्रकार संघाचे रवी केशरवाणी यांनी रेल्वे प्रशासनाकडे उपस्थित केला आहे.

अहमदाबाद-हावडा ला ज्या रेल्वे स्थानकावर थांबा नव्हता तिथे थांबा देण्यात आल्याने पुलगाव येथील प्रवाशांवर अन्याय झाल्याची ओरड आहे. कोरोना काळापूर्वी अमदाबाद -हावडा एक्स्प्रेस व नागपूर-भुसावल पॅसेंजर पुलगाव येथील रेल्वेस्थानकावर थांबत होती. कोरोना काळात तिचा थांबा बंद करण्यात आला. तो पुन्हा सुरू करण्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. पुलगाव हे महत्त्वाचे केंद्र आहे. येथून गाडीत चढणाऱ्या व उतरणाऱ्या प्रवाशांची संख्या लक्षणीय आहे. त्यासोबत उत्पन्नाचा स्त्रोत मोठा आहे. तसेच पुलगाव हे दारूगोळा भंडाराचे ठिकाण असल्याने येथे येणाऱ्या अधिकारी, कर्मचारी वर्गाकरिता ही गाडी सोयीची होती. आर्वी विभागातून जाणाऱ्या प्रवासांना येथून सुविधा प्राप्त होत होती. आता पुलगाव, आर्वी येथील प्रवाशांना कलकत्ता, अहमदाबाद, भुसावळ येथे जाण्याकरिता वर्धा रेल्वेस्थानकावरून गाडी पकडावी लागते. पूर्वी ज्या स्थानकांवर गाडीला थांबा नव्हता, तेथे दोन वर्षाआगोदर थांबा देण्यात आल्याची ओरड आहे.पुलगावचे महत्व रेल्वे विभागाने का दुर्लक्षित केले, हे एक कोडेच आहे. अहमदाबाद-हावडा एक्स्प्रेसला येथे थाबा द्यावा, नागपूर-भुसावळ पॅसेंजर सुरू करण्यात यावी, अशी मागणी तालुका पत्रकार संघाचे पदाधिकारी रवी केशरवानी यांनी केली. याकडे रेल्वे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते.

# एसीसी सिमेंट कंपनीविरोधात एकवटले उसगाव,नकोडा व घुग्घुसचे ग्रामस्थ

## उसगावचा रस्ता पूर्ववत सुरु न केल्यास आंदोलनाचा इशारा



**घुग्घुस । प्रतिनिधी**

येथून जवळच असलेल्या एसीसी सिमेंट कंपनी ते उसगाव पर्यंतच्या रस्त्याची गुरुवार, २२ फेब्रुवारी रोजी जिल्हा परिषद चंद्रपूरचे माजी अध्यक्ष देवराव भोंगळे, उपविभागीय अधिकारी रंजित यादव, तहसीलदार विजय पवार, भाजपा जिल्हा महामंत्री विवेक बोढे, काँग्रेस नेते रोशन पचारे, माजी जि.प.सभापती नितु चौधरी, नकोडा सरपंच किरण बांदूरकर, उसगाव सरपंच निविता ठाकरे, न.प.चे मुख्याधिकारी जितेंद्र गादेवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रकाश अमरशेट्टीवार, संध्या बोधनवार, प्रभारी ठाणेदार प्रशांत साखरे व उसगाव, नकोडा आणि घुग्घुसच्या ग्रामस्थांनी पाहणी केली.

उसगाव येथील ५० ते ६० वर्षापासून सुरु असलेला रस्ता ग्रामपंचायतची पूर्वपरवानगी न घेता तसेच गावकऱ्यांना विश्वासात न घेताच एसीसी कंपनीने बंद केला. हा रस्ता माउंट कार्मेल शाळा तसेच उसगावं वासियांचा मुख्य रस्ता होता. या मार्गावर एसीसीने अवैध कोल व राख डेपो सुरू केला आहे. या राखेचा धूळ मोठ्या प्रमाणात उडून शाळेत येतो. या धुळीमुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शाळेत धुळच धूळ साचला आहे. श्वसनाचे आजार विद्यार्थ्यांना होत आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागा चा रस्ता -उउ कंपनीने अवैद्यरित्या बंद केल्यामुळे उसगाव, नकोडा व घुग्गुस ग्रामवासियांत तीव्र असंतोष पसरला.त्याअनुषंगाने यासंदर्भात उसगाव येथे प्रशासनाची, उसगाव, नकोडा घुग्घुस ग्रामस्थांची आणि एसीसी कंपनी व्यवस्थापनाची बैठक पार पडली. बैठकीत दोन दिवसात प्रशासनातर्फे उसगावचा रस्ता पूर्ववत सुरु करण्यासंदर्भात निर्णय घेण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. याप्रसंगी बोलतांना जिल्हा परिषद माजी अध्यक्ष देवराव भोंगळे म्हणाले की उसगावचा रस्ता पूर्ववत सुरु करण्यासाठी एसीसी सिमेंट कंपनीला प्रशासनातर्फे आदेश देण्यात आले होते परंतु एसीसी सिमेंट कंपनीने मुजोरी करीत हा रस्ता सुरु केला नाही. एसीसी सिमेंट कंपनीची दडपशाही कदापी सहन केली जाणार नाही. दोन दिवसात उसगावचा रस्ता पूर्ववत सुरु केला नाहीतर एसीसी सिमेंट कंपनीविरुद्ध आंदोलन करण्यात येईल.यावेळी घुग्घुसचे माजी सरपंच संतोष नुने, नकोडा उपसरपंच मंगेश राजगडकर, काँग्रेस नेते प्रेमानंद जोगी, माजी पं. स. सभापती वर्षा ताजने, सिनू इसारप, साजन गोहने, वैशाली ढवस, अमोल थेरे, विनोद चौधरी, धनंजय ठाकरे, रत्नेश सिंग, शाम आगदारी, श्रीकांत सावे, मानस सिंग, तुलसीदास ढवस, विनोद जंजर्ला, वमशी महाकाली, विवेक तिवारी व मोठया संख्येत नागरिक उपस्थित होते.

# प्रेमलेखन म्हणजे प्रेमबोध होय!

**संतशिरोमणी रोहिदास उर्फ सदुरुदेव रविदास महाराज हे इ.स.१५ ते १६व्या शतकादरम्यान भक्ती चळवळीचे भारतीय रहस्यवादी कवी होते. त्यांच्या भक्तिगीतांचा भक्तिचळवळीवर पंजाब, उत्तरप्रदेश, राजस्थान, महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश या प्रदेशात गुरू– शिक्षक म्हणून कायमचा प्रभाव पडला आहे. ते कवी–संत, समाजसुधारक व आध्यात्मिक व्यक्तिमत्त्व होते. गुरुग्रंथ साहिब या शीख धर्मग्रंथांमध्ये सदुरू रविदासजींच्या भक्तिगीतांचा समावेश आहे. हिंदू धर्मातील दादूपंथी परंपरेच्या पंचवाणी मजकुरामध्ये त्यांच्या असंख्य कवितांचा समावेश आहे. संतश्रेष्ठ रविदासजींनी जाती आणि लिंग यांच्यामधील सामाजिक भेदभाव हटविण्यास आणि वैयक्तिक आध्यात्मिक स्वातंत्र्य मिळवण्याच्या प्रयत्नात एकतेला प्रोत्साहन दिले. हा संत चरणरज– श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी यांचा ज्ञानवर्धक लेख… संपादक.**

ऐसा चाहूँ राज मैं जहाँ मिलै सबन को अन्न।
छोट बड़ो सब सम बसै, रैदास रहै प्रसन्न।।

संत रोहिदास यांचा जन्म सुमारे इ.स. १४५०मध्ये झाला असावा असे म्हणतात. भारतवर्षात त्यांची जयंती दरवर्षी माघ पौर्णिमेस मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येते. त्यांचा जन्म वाराणसीजवळील सीर गोवरधनपूर गावात झाला आहे. त्यांचे जन्मस्थान श्री सदुरू रविदास जन्मस्थान म्हणून ओळखले जाते. त्यांची आई घुरबिनिया आणि त्यांचे वडील रघुराम होत. त्यांचे पालक चर्मकार होते; ते चामड्याच्या वस्तू तयार करीत. त्यांनी त्यांचे बहुतांश आयुष्य गंगा नदीच्या काठावर आध्यात्मिक अनुयायांमध्ये– सूफी संत, साधू व तपस्वी यांच्या सहवासात घालविले. भारतभर फिरून त्यांनी महान कार्य केल्यामुळे ते जाणले जातात. ते समाजसुधारक संतांमध्ये अग्रणी होते. ते कुलभूषण संतकवी होते. तसेच तत्कालीन प्रचलित सामाजिक विद्वान होते. त्यांनी लक्षणीय योगदान दिले. त्यांच्या गुरुग्रंथ साहिबमध्ये असलेल्या भक्तिरचना आजही लोकप्रिय आहेत–

कृस्न, करीम, राम, हरि, राघव, जब लग एक न पेखा।
वेद कतेब कुरान, पुराणन, सहज एक नहिं देखा।।

संतशिरोमणी रोहिदास उर्फ गुरु रविदास महाराज हे इ.स.१५ ते १६व्या शतकादरम्यान भक्ती चळवळीचे भारतीय रहस्यवादी कवी होते. त्यांच्या भक्तिगीतांचा भक्तिचळवळीवर पंजाब, उत्तरप्रदेश, राजस्थान, महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश या प्रदेशात गुरू– शिक्षक म्हणून कायमचा प्रभाव पडला आहे. ते कवी–संत, समाजसुधारक व आध्यात्मिक व्यक्तिमत्त्व होते. गुरुग्रंथ साहिब या शीख धर्मग्रंथांमध्ये सदुरू रविदासजींच्या भक्तिगीतांचा समावेश आहे. हिंदू धर्मातील दादूपंथी परंपरेच्या पंचवाणी मजकुरामध्ये त्यांच्या असंख्य कवितांचा समावेश आहे. संतश्रेष्ठ रविदासजींनी जाती आणि लिंग यांच्यामधील सामाजिक भेदभाव हटविण्यास आणि वैयक्तिक आध्यात्मिक स्वातंत्र्य मिळवण्याच्या प्रयत्नात एकतेला प्रोत्साहन दिले–

जाति–जाति में जाति हैं, जो केतन के पात।
रैदास मनुष ना जुड़ सके जब तक जाति न जात।।

विविध भक्ती चळवळीतील कवयित्रींच्या प्राचीन जीवनांपैकी एक असलेला अनंतदास परचाईचा हा मजकूर सदुरु रविदासजींच्या जन्माची ओळख करून देतो– बनारस शहरामध्ये, कोणत्याही वाईट गोष्टी कधीही पुरुषांना भेट देत नाहीत. जो कोणी मरण पावला तो नरकात जात नाही, स्वत: शंकर राम या नावाने येतो. जेथे श्रुती आणि स्मृती यांचा अधिकार आहे, तेथे रोहिदासांचा पुनर्जन्म झाला.



रविदास जन्म के कारनै, होत न कोउ नीच।
नर कूँ नीच करि डारि है, ओछे करम की कीच।।

आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान आणि हिमालयातील हिंदू तीर्थक्षेत्रांना त्यांनी भेटी दिल्या. त्याने परमात्म्याचे सगुण– गुणधर्म, प्रतिमेसह असलेले स्वरुप सोडून दिले आणि निर्गुण– गुणधर्मांशिवाय, अमूर्त असलेल्या परमात्म्यांच्या स्वरुपावर लक्ष केंद्रित केले. बहुतेक विद्वानांचा असा विश्वास आहे, की संतशिरोमणी रोहिदास हे शीखधर्माचे संस्थापक श्रीगुरु नानकदेवजी यांना भेटले. त्यांचा शीख धर्मग्रंथात आदर आहे आणि सदुरू रविदासांच्या ४१ कवितांचा आदि ग्रंथात समावेश आहे. या कविता त्यांच्या कल्पना आणि साहित्यिक कामांचे सर्वात जुने प्रमाणित स्त्रोत आहेत. रविदासांच्या जीवनाबद्दल आख्यायिका आणि कथांचा आणखी एक महत्त्वाचा स्त्रोत म्हणजे शीख परंपरेतील प्रेमलेखन म्हणजे प्रेमबोध होय. सन १६९३मध्ये संतश्रेष्ठ रविदास यांच्या मृत्यूनंतर १५० वर्षांहून अधिक काळ रचलेल्या या मजकुरामध्ये भारतीय धार्मिक परंपरेतील सतरा संतांपैकी एक म्हणून त्यांचा समावेश आहे. संत रवीदासांच्या जीवनाविषयी इतर बहुतेक लेखी स्त्रोत, शीख परंपरा आणि हिंदू दादुपंथी परंपरेचे ग्रंथ हे २०व्या शतकाच्या सुरूवातीस किंवा सुमारे चारशे वर्षांनंतर तयार केले गेले होते.

रैदास कनक और कंगन माहि जिमि अंतर कछु नाहिं।
तैसे ही अंतर नहीं हिन्दुअन तुरकन माहि।।

विन्नंद कॉलवेर्टने नमूद केले आहे, की गुरुदेव रविदासांवर अनंतदास यांच्या संतचरित्राची चाळीस हस्तलिखिते भारताच्या विविध भागात सापडली आहेत. शिख बांधवांचा आदिग्रंथ– गुरुग्रंथ साहिब आणि हिंदू योद्धा–तपस्वी गटाचे पंचवाणी दादूपंथी हे गुरू रविदासांच्या साहित्यकृतींचे दोन प्राचीन साक्षात स्त्रोत आहेत. त्यांच्या कवितेत द्वितीय किंवा तृतीय श्रेणी असमान नागरिक, वैराग्याची आवश्यकता आणि खरा योगी अशा विषयांचा समावेश आहे. पीटर फ्राईड लँडर असे म्हणतात, की संत रविदासजींच्या मृत्यूनंतरही त्यांचे लिखाण भारतीय समाजात संघर्षाचे आहे. त्यांचे जीवन विविध प्रकारच्या सामाजिक आणि आध्यात्मिक विषयांना अभिव्यक्त करण्याचे साधन ठरत आहे. कारण–


हिंदू तुरक नहीं कछु भेदा सभी मह एक रक्त और मासा।
दोऊ एकऊ दूजा नाहीं, पेख्यो सोइ रैदासा।।

!! जयंती निमित्त त्यांना व त्यांच्या समाजोद्धाराच्या क्रांतिकारी कार्यांना विनम्र अभिवादन !!

**संतचरणरज**
**श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी.**
**(मराठी व हिंदी साहित्यिक)**
**प.पू.गुरुदेव हरदेव कृपा निवास, रामनगर– गडचिरोली.**
**मधुभाष– ७७७५०४१०८६.**

# अंधश्रध्दा माणसाला दैववादी बनविते – संत गाडगेबाबा

गाडगेबाबा एक महान संत होते, परंतु संताची पारंपारिक बिरुदे त्यांनी कधी मिरवली नाहीत. अगदी साध्या आणि सोप्या शब्दात त्यांनी आपल्या सामान्य माणसाला भजन किर्तनातून जागे केले. भुकेलेल्यांना अन्न, तहानलेल्यांना पाणी, उघडया नागडयांना वस्त्र, गरीब मुला–मुलींना शिक्षण, बेघरांना आसरा, रोग्यांना औषोधोपचार, गावठाण स्वच्छ ठेवायचे, बेकारांना रोजगार, पशु–पक्षांना अभय, गरीब तरुण–तरुणीचे लग्न, दु:खी व निराशांना समाजाने हिम्मत द्यावी, असा बाबांचा आयुष्यभर ध्यास होता आणि ते शहरा–शहरातून, खेडया–पाडयातून भजन किर्तनातून लोकांना चेतविण्याचे काम करीत असत. अंधश्रध्दा ही माणसाला दैववादी बनविते आणि दैववाद हा नेहमी घातक असतो.



त्यादिवशी रत्नागिरी जिल्हयातल्या खारेपाटण या गावी बाबांचे किर्तन होते, गोपालाच्या गजरातुन किर्तनाला सुरुवात झाली, वातावरण भरुन गेले. देहभान विसरुन जनता नाचू लागली. त्याच क्षणी तार घेऊन पोस्टमन आला. बाबांना आलेली ती तार गोविंदाच्या बाबांच्या एकुलत्या एक मुलाच्या मृत्यूची होती. किर्तनातून तारेतील बातमी कशी सांगावी याचा विचार करीत तो उभाच राहिला. तेवढयात बाबा त्याला ओरडले, अरे उभा का आहेस ? बसखाली ! या संधीचा फायदा घेऊन पोस्टमनने बाबांना सांगितले. बाबा, आपला गोविंदा वारला हो ! ही तार आलीय ! गोविंदा वारला ! हे शब्द ऐकुन बाबा क्षणभर शांतपणे उभे राहिले. एकक्षण झाला नि एकदम निर्विकार मुद्रेने ते मोठयाने म्हणाले, ऐसे किती गेले कोटयाने, कां रडु एकासाठी ? पण ६ डिसेंबर १९५६ रोजी जेव्हा डॉ. बाबासाहेबांचे महापरिनिर्वाण झाले, तेव्हा गाडगेबाबा सतत १४ दिवस दु:खी राहले व अन्न पाण्याचा त्याग केला. १५ व्या दिवशी म्हणजे २० डिसेंबर १९५६ रोजी त्यांचेही निर्वाण झाले. गाडगे महाराजांसारखा पुन्हा संत होणे नाही.

ते आपल्या काही टाळकऱ्यां समवेत गावोगाव जाऊ लागले आणि देवापुढे बकरे व कोंबडे बळी देणे किंवा त्यांना दारुचे नैवेद्य दाखवून मग ती दारु स्वत: पिणे, अस्पृश्यता मानणे, कर्ज काढून थाटात लग्न करणे, शिक्षणाकडे दुर्लक्ष करणे अशा गोष्टींवर आपल्या वारकरी पध्दतीच्या किर्तनातून कडक टिका करु लागले. असा कसा तुमचा देव। कोंबडयांचा घेतो जीव।। अशा तऱ्हेचे अंधरुढींवर प्रहार करणारे अभंग–चरणगात, बघूनच श्रोत्यांना खोचक प्रश्न विचारुन त्यांची स्वत:च उत्तरे देत अधून मधून गोपाला गोपाल देवकीनंदन गोपाला, असा गजर करीत. त्यांनी केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर गुजरात व कर्नाटकातील भोळया–भाळया लोकांना सन्मार्ग दाखविला. आज हुंडा विरोधी चळवळ फार जोरात चालू आहे, पण त्याकाळात बाबांनी या घातक पध्दतीचा किर्तनातून चांगलाच खरपुन समाचार घेतला. लग्नात हुंडा देण्या–घेण्याने लोक कर्ज बाजारी होतात. मग कर्ज फेडता–फेडता त्यांचा नाकी नऊ येऊन कित्येक संसार उद्ध्वस्त होतात, म्हणून दु:खात आयुष्य घालविण्यापेक्षा झुणका–भाकरी व लग्ने लावल्यास दोन्ही पक्षांना व नवरा–नवरीला सुखाचे दिवस घालविता येतील, असा संदेश ते लोकांना देत असत.

संत गाडगेबाबा यांच्या बाबतीत बोलायचं झाले तर गाडगेबाबा हे शिकलेले नव्हते, परंतु त्यांनी देशाला शिकविले. देशाला समता, बंधुता, प्रेम व सत्कर्माचा मार्ग दाखविला आहे. हे करतांना मात्र अंधश्रद्धा, पाखंड, विषमता, भेदभाव, कर्मकांड यावर प्रबोधन करून समाजाला जागृत केले व शिक्षणाचा संदेश आपल्या किर्तनामधुन संत गाडगेबाबा यांनी दिला. संत गाडगेबाबा अडाणी असुनही आज आम्हाला वंदनीय कां आहेत, तर गाडगेबाबा यांनी समाजासाठी जे काही केले ते निस्वार्थ भावनेने व लोककल्याणासाठी केले. अडाणी असले तरीही भल्याभल्यांना लाजवेल, अशी कामे त्यांनी केली. वेगवेगळ्या ठिकाणी धर्मशाळा बांधून लोकांना आश्रय निर्माण करून दिला. धर्मशाळेमध्ये भोजन व निवास व्यवस्था करून दिली आणि सर्वात महत्वाचे म्हणजे धर्मशाळेची जबाबदारी देतांना ते खुप विचार करत होते. सर्वांसाठी जेवन एकच असले पाहिजे, धर्मशाळा सांभाळणारे वा तेथे काम करणारे इमानदार असले पाहिजे, ते व्यसनी नसावे, त्यांचे नातेवाईक नेहमी धर्मशाळेत येता कामा नये. एखाद्या वेळी आलेच तर फक्त एका वेळची जेवनाची सोय तेथे होईल, बाकी त्यांना त्यांची सोय बाहेर करावी लागेल. आजचा विचार केला तर याउलट परिस्थिती आहे, राजकीय लोकांचे काम गाडगेबाबा यांच्या विचाराविरोधात आहेत. गाडगेबाबा यांनी लोकवर्गणीतून एवढ्या धर्मशाळा बांधल्या परंतु त्याचा एकही रुपया स्वतः साठी खर्च केला नाही ही आजच्या व्यवस्थेला भ्रष्ट सरकारला चपराक आहे.

कोटीच्या धर्मशाळा। बांधल्या लोकांसाठी।
झोपडी नशिबी नाही। कुंताबाईच्या।
काढीले अन्नछत्र।भुकेले होती तृप्त।
वाट्याला माझ्या। नाही अन्नशित।

लोकांच्या पोटापाण्याची आणि राहण्याची सोय करून देणाऱ्या गाडगेबाबा यांच्या पत्नीला मात्र गरीबीतच जिवन जगावे लागले, कारण गाडगेबाबा करोडो रुपयांच्या धर्मशाळा व अन्नछत्र बांधत असले, तरी तो पैसा लोकांचा आहे. म्हणून वैयक्तिक खर्च करणार नाही, एवढे प्रामाणिक व समाजाप्रती संवेदनशील गाडगेबाबा होते. आजचे लोक तर लोकांच्या पैशावर अगोदर स्वतः चे घर भरतात, बेईमानी करतात, स्वतःला महाराज समजणारे लोक गोरगरीब लोकांकडून पैसा उकळून स्वतः चे घर भरतात व समाजामध्ये अंधश्रद्धा पसरवतात. गाडगेबाबा यांनी अंधश्रद्धा व कर्मकांड यावर समाजात भरपूर प्रबोधन करून समाजाला विज्ञानवादी बनविण्याचा भरकस प्रयत्न केला. तिर्थ कर्मकांड हे पैशाचा नाश करणारे आहेत, ते पोट भरण्याचे साधने आहेत. देवाच्या नावाखाली लोकांची होणारी आर्थिक व मानसिक पिळवणूक यामुळे गाडगेबाबा यांचे मन उदास होत होते, म्हणून गाडगेबाबा म्हणायचे :

देव देव करता शिणले माझे मन
पाणी आणि पाषान जिथे तिथे


दगडामध्ये व तिर्थामध्ये देव नसतो, तिथे तर फक्त पाणी आणि दगड असतात. देव बघायचा असेल तर माणसात बघा आणि त्याची सेवा करा असा उपदेश गाडगेबाबा करत असत. परंतु हा उपदेश आजही काही लोकांच्या जिव्हारी लागतो, कारण लोकांची दिशाभुल करून लोकांचे पैसे हडपण्याचे कार्य आजच्या स्वयंघोषित महाराजांकडून तर लोकांच्या हक्काचे पैसे गिळंकृत करण्याचे काम राजकीय नेत्यांकडून केले जात आहेत. आजही लोकांना दगडातील देवासाठी भक्ती करायला लावली जात आहे आणि त्यामुळे मंदीराबाहेर भिकाऱ्यांची संख्या मात्र वाढत आहे, हिच खरी भारताची शोकांतिका आहे. आज देशात तेच घडत आहे, जे गाडगेबाबांनी फार वर्षापूर्वी सांगितले होते. म्हणुन ते म्हणत शिक्षित बना, विज्ञानवादी बना, देवालयात जाऊ नका, अंधश्रध्देला भीक घालू नका !

शिक्षणाचे उदाहरण पटवून देतांना आणि लोकांना समजेल असे एकमेव उदाहरण म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर ! डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिकले म्हणून त्यांनी देशाची घटना लिहली, त्यांचा इतका शिक्षित देशात कुणी नव्हताच. म्हणुनच त्यांना घटना लिहण्याची विनंती करण्यात आली. जर ते शिकलेच नसते तर घटना लिहु शकले नसते, म्हणून परिस्थितीला आड आणुन मुलांना शिक्षणापासून दुर ठेऊ नका, अंगावर लुगडं कमी भावाचं घाला, भाकरी हातावर घेऊन खा, पण मुलांना शाळा शिकवा, शिक्षणामुळे कुळाचा उध्दार होऊ शकतो, असेही ते किर्तनात पटवून देत असत. ही शिकवण म्हणजे आजही समाजाला दिशा देणारी आहे. पंढरपूर येथे बांधलेली धर्मशाळा त्यांनी ती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे सुपूर्द करून दिली.

आपले विचार साध्या भोळया लोकांना समजण्यासाठी ते ग्रामीण भाषेचा (प्रामुख्याने वऱ्हाडी बोलीचा) उपयोग करत असत. गाडगेबाबांनी संत तुकारामांच्या नेमक्या अभंगाचा मुबलक वापरही वेळोवेळी केला. 'देवभोळया माणसा पासून ते शहरी नास्तिका पर्यंत, कोणत्याही वयोगटातील लोकांना गाडगेबाबा आपल्या किर्तनात सहजपणे गुंतवून ठेवत, आपले तत्वज्ञान पटवून देत. त्यांच्या किर्तनाचे शब्दचित्र उभे करणे माझ्या ताकदी बाहेरचे काम आहे' असे उद्गार बाबांचे चरित्रकार प्रबोधनकार ठाकरे यांनी काढले होते.

गाडगे महाराज यांनी नाशिक, देहू, आळंदी व पंढरपूर या धार्मिक क्षेत्रांच्या ठिकाणी धर्मशाळा बांधल्या, गोरगरीब जनतेसाठी छोटी मोठी रुग्णालये बांधली, अनेक नद्यांकाठी घाट बांधले, अतिशय गरीब, अनाथ व अपंग लोकांसाठी अन्नछत्रांची व्यवस्था केली, कुष्ठरोग्यांची सेवा केली. 'महाराष्ट्रातील समाजवादाचे प्रचंड व्यासपीठ' असे यथार्थ उद्गार आचार्य अत्रे यांनी संत गाडगे बाबांबद्दल काढले आहेत. 'गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला' या भजनाचा प्रसार करणाऱ्या, कर्मयोगावर दृढ श्रद्धा असणाऱ्या या सत्पुरुषाची आणि कर्त्या समाजसुधारकाची समाधी अमरावती येथे आहे. अमरावती विद्यापीठाला गाडगे बाबांचे नाव देऊन 'संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ' असे नामकरण करण्यात आलेले आहे.

शिक्षण ही काळाची गरज आहे. दु:खावरील जालीम औषध आहे. शिक्षण समाज प्रबोधनाचा मार्ग आहे, शिक्षण हे समाज सुधारक याची गुरुकिल्ली आहे, हे सर्वविधीत आहे. तिथे सामान्यांच्या मुलांसाठी शाळा, महाविद्यालय उघडली. शिक्षणक्षेत्रात काम करणारे समकालीन संत तुकडोजी महाराज, डॉ. पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या सर्वांना त्यांनी शिक्षण क्षेत्रात मोलाचे प्रोत्साहन दिले आणि शिक्षणाचे महत्व गिरविले. आपल्या भजन किर्तनातून माणसांना शिक्षणाचे महत्व सामान्य लोकांना पटवून दिले आणि शिक्षणाचे द्वारे लोकांकरीता खुले केले. आपल्या व्यक्तिक अनुभवावरुन समाजशिक्षण अभावी किती लंगडा आहे, हे त्यांनी जाणले होते. त्यासाठी त्यांनी धर्मशाळा, घाट, मंदिरे स्थापनेपेक्षा शिक्षण मंदिराकडे आपला मोर्चा वळविला. त्यांनी आपल्या जीवनात महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात अनेक शिक्षण संस्था उभ्या केल्या. अनाथाश्रम, आश्रमशाळा, वस्तीगृहे या सारख्या संस्था निर्माण करुन गोरगरीब मुलांची राहण्याची व शिक्षणाची सोय अख्या महाराष्ट्रात व बाहेर केल्याचे आपणास दिसून येते. त्यांच्या या अथक परिश्रमातून हेवा वाटावा असे त्यांनी कर्म केले आहे. त्यांच्या १४८ व्या जन्मदिनी शतश: अभिवादन !



**प्रविण बागडे**
**जरीपटका, नागपूर – १४**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**

# हिंगणघाट तालुक्यातील चिंचोली येथील शेकडो कार्यकर्त्यांनी केला महिलांसह भाजपात प्रवेश

## आ.समिर कुणावार यांचे प्रमुख उपस्थितीत स्वीकारला भाजपाचा शेला



**हिंगणघाट । प्रतिनिधी**

हिंगणघाट विधानसभा क्षेत्रात दिवसेंदिवस भाजपाचा मोठया प्रमाणात विस्तार होत असून विधानसभा क्षेत्रातील नागरीक, युवा कार्यकर्ते तसेच महीला आ.समिर कुणावार यांचे नेतृत्वावर विश्वास व्यक्त करीत मोठया प्रमाणात भारतीय जनता पक्षात प्रवेश करीत आहेत.

२३ फेब्रुवारी रोजी हिंगणघाट तालुक्यातील चिंचोली येथील बहुसंख्य महिला व युवा कार्यकर्त्यांनी आ. समीर कुणावार यांचा विधानसभा क्षेत्रातील लोकाभिमुख विकास तसेच कार्यसम्राट आमदार यांची कार्यशैली पहाता मोठ्या संख्येने भाजपात प्रवेश केला.

सदर प्रवेश सोहळ्याचे आयोजन २३ फेब्रुवारी रोजी आ. समीर कुणावार यांच्या स्थानिक जनसंपर्क कार्यालयात करण्यात आले.

याप्रसंगी प्रामुख्याने संजय तुराळे, सुरज कुराळे, प्रमोद तुराळे ,अंकुश टेंभेकर , श्रीकांत वाघमारे, वंदना घोडे ,केशव वाघमारे, संदीप क्षीरसागर , राजीव तुराळे, देविदास फाटे, संतोष कुंभारे, विनोद लोंढे, शंकर मिटकर, विनोद सोनटक्के ,महेंद्र तुराळे, रामाजी मेश्राम, शंकर थाटे, अमित कुराळे, शंकर उघडे, दिलीप ठाकरे, रणजीत मेश्राम, अक्षय तूराळे ,राजू पेटकर, सिताराम मिटकर, ज्ञानेश्वर मिटकर, संभा मिटकर ,वंदना ताई घोडे, सुमन सोनटक्के, विमल राऊत, धनराज सोनटक्के, दिलीप सोनटक्के, प्रल्हाद दांडगे, रामदासजी भोयर, हनुमान दांडगे, लक्ष्मी भोयर, गुणवंत मोहितकर, साहेबराव सोनटक्के, बालाजी इखार ईत्यादी कार्यकर्त्यांना भाजपात रितसर प्रवेश देण्यात आला. उपरोक्त कार्यक्रम आमदार समीर कुणावार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

सदर कार्यक्रमाचे वेळी कार्यसम्राट आ.समीर कुणावार यांचेसह महामंत्री आकाश पोहाणे, हिंगणघाट ग्रामीण भाजपा तालुकाध्यक्ष विनोद विटाळे ,आदिवासी आघाडी जिल्हाध्यक्ष शंकर आश्रम, हिंगणघाट शहर प्रमुख भाजपा संजय माडे, माजी जिल्हा परिषद सदस्य योगेश फुसे , माजी जिल्हा परिषद सदस्य तथा कृषी उत्पन्न बाजार समिती हिंगणघाट चे संचालक प्रफुल बाडे , फटके विमुक्त आघाडी जिल्हाध्यक्ष प्रल्हाद दांडगे, भटके विमुक्त आघाडी जिल्हा उपाध्यक्ष गजानन चिडे इत्यादी भाजपा पदाधिकारी तसेच जेष्ठ कार्यकर्ते उपरोक्त पक्षप्रवेश सोहळ्यास उपस्थित होते.

# निवृत्ती वेतनधारकांनी पॅन क्रमांक आधार क्रमांकाशी लिंक करण्याचे आवाहन

**चंद्रपूर**–चंद्रपूर कोषागार कार्यालयांतर्गत बँकेद्वारे निवृत्तीवेतन घेणा–या वेतनधारकांनी पॅन क्रमांक आधार क्रमांकाशी लिंक करणे अनिवार्य आहे. ज्या निवृत्ती वेतनधारकांनी अजूनपर्यंत आपले पॅन क्रमांक आधार क्रमांकाशी जोडले नाही, अशा आयकर दात्याच्या खात्यामधून माहे फेब्रुवारीच्या वेतनातून २० टक्के प्रमाणे आयकर वसूल करण्यात येईल. त्यामुळे सर्व निवृत्ती वेतनधारकांनी त्वरीत पॅन क्रमांक आधारशी लिंक करावा, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी संजय पडीशाला यांनी केले आहे.



# भाजपा कार्यकर्त्यांनी प्रामाणिकपणे काम करून देशाला पुन्हा एकदा मजबूत नेतृत्व द्यावे-पंकजाताई





**आष्टी** –स्त्री मुख्य पदावर असण्याचा समाजाला फायदा असतो.आयुष्यात प्रत्येकाला संघर्ष करावाच लागतो.मात्र आता चांगल्या व्यक्तीला,चांगल्या विचारांना खतपाणी देणे ही काळाची गरज असून येणा-या लोकसभेत बीडचा भाजपाचा उमेदवार कुणीही असो आपण भारतीय जनता पार्टीचा कार्यकर्ता म्हणून प्रामाणिकपणे काम करून देशाला पुन्हा एकदा मजबूत नेतृत्व द्यावे कारण प्रथम राष्ट्र, नंतर संघटन, शेवटी स्वतः ही भारतीय जनता पक्षाची शिकवण असल्याचे प्रतिपादन भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी व्यक्त केले आहे.

भारतीय जनता पार्टीने थेट तळा-गाळातील सर्वसामांन्य नागरिकांच्या अडी-अडचणी सोडविण्याच्या कामे प्रत्येक कार्यकर्त्यांना सोडविण्यासाठी काम करण्याचे सांगीतले आहे.भाजपाच्या प्रत्येक पद हे शोभेसाठी नसून कामे करून घेण्याची जबाबदारी येणाऱ्या काळात आपल्या सर्वांवर असल्याचेही आ.धस यांनी सांगीतले.आष्टी येथील मोरेश्वर मंगल कार्यालयात गुरूवार दि.२२ रोजी दुपारी ३ वा.आयोजित करण्यात आलेल्या आष्टी विधानसभा मतदान संघाच्या गण प्रमुख,शक्ती केंद्र प्रमुख,बुथ वॉरीअर्स, विस्तारक, प्रवासी तसेच प्रमुख कार्यकर्ता बैठकीत मार्गदर्शन करतांना पंकजाताई मुंडे बोलत होत्या.यावेळी व्यासपीठावर आ.सुरेश धस, सुपर वॉरियर मराठवाडा विभाग प्रमुख अनिल काळे,युवा नेते जयदत्त धस, विस्तारक हरीश खाडे,आष्टी भाजपा तालुकाध्यक्ष साहेबराव म्हस्के, भाजपा शिरूर तालुकाध्यक्ष सुरेश उगलमुगले,पाटोदा तालुकाध्यक्ष भागवत येवले, माऊली जरांगे, अमर निंबाळकर, भाऊसाहेब भवर,माजी जि.प.अध्यक्ष सय्यद आब्दुला, माजी जि.प.अध्यक्ष सविता गोल्हार, गणेश शिंदे,महेंद्र गर्जे, आष्टी नगराध्यक्ष जिया बेग,पाटोदा नगराध्यक्ष राजू जाधव, नगराध्यक्ष रोहिदास गाडेकर,उप नगराध्यक्ष प्रकाश देसरडा,कृषी उत्पन्न बाजार समिती कडा सभापती रमजान तांबोळी, पाटोदा बाजार समिती सभापती किरण शिंदे,चंपाताई पानसंबळ, डॉ.शैलाजा गर्जे यांच्यासह आष्टी, पाटोदा, शिरूरचे भाजपा तालुकाध्यक्ष यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

पुढे बोलतांना पंकजा मुंडे म्हणाल्या, आष्टी विधानसभा मतदार संघाचे काम महाराष्ट्रात नंबर एक असून, सरल ऍप मध्ये महाराष्ट्रत एक नंबरवर सदस्यांची नोंदणी आ.धस यांनी करून घेतली त्यांचे अभिनंदन आणि कौतुकास्पद काम असल्याचे त्यांनी सांगीतले. असेच काम आगामी लोकसभा निवडणुकीमध्ये सर्वांनी पक्ष जो उमेदवार देईल त्याचे करायचे अशी खूणगाठ बांधावी असे आवाहन करत सद्यस्थितीत बीड आणि बारामती या दोन जिल्ह्यांकडे पाहूण राजकारणांचा अंदाज लावला जात आहे.माझे कार्यकर्ते स्वाभिमानी आहेत.ते केवळ मुंडे साहेबाचा फोटो आणि पंकजा ताईंचा चेहरा बघतात.यावेळी कार्यकर्त्यांकडून त्यांच्या आगमन वेळी फुलांची उधळण केली तेव्हा प्रत्येक पाकळी माझ्यावर जबाबदारीचे ओझे घेऊन येत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.या गोष्टीचा मला अहंकार नाही.संघर्षाला सोन्याची किनार कार्यकर्ते देतात, असे पंकजा कार्यकर्त्यांना म्हणाल्या. यावेळी आ.धस म्हणाले,आम्ही पक्षाने दिलेली जबाबदारी पुर्णपणे पार पाडत आहोत दिवार लेखन सुध्दा संपूर्ण मतदार संघातील ४४१ बुथ केंद्रांवर आम्ही केले आहे.तसेच पार्टी जो आदेश देत आहोत तो आम्ही आपल्या मार्गदर्शनाखाली पुर्ण करीत आहोत.पुन्हा गावचलो अभियान हे ४४१ बुथ केंद्र दोन दिवसात आम्ही पुर्ण केले आहेत.आणि सर्व कामे पुर्ण झाल्यावर सरल ॲपवर डाऊनलोड करण्याचे सांगीतले त्या प्रमाणे हे सर्व कामे आम्ही आपलोड केले .येणाऱ्या काळात भाजपाचे पुन्हा एकदा मजबूत सरकार आपल्याला आणायचे असून जिल्ह्याचा खासदार रेकॉर्ड ब्रेक मताने निवडून आणण्यासाठी आत्तापासूनच आपण कामाला लागले पाहिजे असे सांगितले.यावेळी कडा येथील जेष्ठ कार्यकर्ते भाऊसाहेब कर्डीले यांनी पंकजाताई मुंडे आणि आ.सुरेश धस यांच्या उपस्थितीत भाजपा पक्षात प्रवेश केला.

### कोणत्याच पालकमंञ्यांनी एवढे कामे केले नाहीत

आज पर्यंत बीड जिल्ह्याला अनेक पालकमंञी मिळाले पण आजपर्यंत पंकजा मुंडे यांनी आपल्या पालकमंञी पदाच्या काळात छोट-छोट्या गावात कामांसाठी निधी मोठ्या प्रमाणावर दिला .आत्तापर्यत बीड जिल्ह्यात कोणत्याच पालकमंञी यांनी दिला नाही अन् देणार ही नाही एवढा भरभरून निधी पंकजा मुंडे यांनी पालकमंत्री असतानाच्या काळात दिला असल्याचेही आ.धस यांनी सांगितले.

# सेलू मध्ये विना परवाना दारू विक्री करणाऱ्या वर कारवाई

## २ आरोपी गजाआड;४० हजाराचा मुद्देमाल

**सेलू । प्रतिनिधी**

सेलू येथील आठवडी बाजार परिसरात विनापरवाना बेकायदेशीर रित्या देशी-विदेशी दारू विक्री करणाऱ्या वर पोलिसांनी धाड टाकत सोमवारी दोन आरोपींना अटक करून ४० हजाराचा मुद्देमाल जप्त केला. पोलिसांनी केलेल्या या धडक कारवाईमुळे अवैधरीत्या दारू विक्री करणाऱ्यांचे लक्ष वेधले या कारवाईमध्ये सेलू येथील आठवडी बाजार परिसरात विनापरवाना बेकायदेशीर रित्या देशी-विदेशी दारू विक्री होत असल्याचे गुप्त माहिती पोलिसांना मिळाल्यावर प्रभारी पोलीस निरीक्षक प्रभाकर कवाळे यांना दारू विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यावर पोलीस पथक तयार करण्यात आले.या पथकाने आठवडी बाजार परिसराच्या मागील



मोकळ्या जागेत सखाराम कठाळू उगले व सुरेश केशव पडुळकर हे दोघे विनापरवाना बेकायदेशीर रित्या देशी दारू भिंगरी-संत्रा व विदेशी दारू विक्री करत असल्याचे आढळून आले पोलिसांनी धाड टाकून देशी दारू १८० एम एल २६,६७० रुपये किमतीच्या ३८१ बॉटल ११,५८४ रुपये किमतीचे ९० एम एल ३३१ बॉटल तसेच विदेशी दारूच्या ४ बॉटल किंमत ६०० रुपये असा एकूण ३८ हजार ८८५ रुपयाचा मुद्देमालासह दोन्ही आरोपींना पोलीस अटक करून प्रभारी पोलीस निरीक्षक प्रभाकर कवाळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दोन्ही आरोपीवर महाराष्ट्र दारूबंदी कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक प्रमोद देशमुख महिला अमलदार वंदना आदोडे पोलीस अमलदार राठोड,तेलंगे,जानकर,रासकटला,जाधव आधी पोलीस अधिकाऱ्यांचे पथक नेमण्यात आले होते

# कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या परळी येथील घरासमोर १ मार्च पासून धरणे आंदोलन

**अबांजोगाई (वार्ताहर)**–ऊस उत्पादक शेतृकरी व साखर कामगारांचे थकीत बिले मिळविण्यासाठी बीडचे मा.पालकमंत्री तथा कृषीमंत्री महाराष्ट्र राज्य ना.धनंजय मुंडे साहेब यांचे परळी येथील घरासमोर ऊस उत्पादक शेतकरी व साखर कामगार बेमुदत धरणे आंदोलन दिनांक १ मार्च २०२४पासून सुरू करत असले बाबतीतचे निवेदन देण्यात आले आहे.. याविषयी अधिक माहिती अशी की,अंबाजोगाई सहकारी साखर साखर कारखाना , लि.अंबासाखर कारखाना भाडेतत्त्वावर चालवणारी कंपनी व्यंकटेश्वरा इंडस्ट्रीज सर्विसेस प्रा. लि.परळी यांचेकडे गळीत हंगाम सन २०२१-२०२२ व २०२२ -२०२३ मधील ऊस गाळप केलेल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे कोट्यावधी रुपये थकीत आहेत.तसेच कारखान्यात काम करणारे साखर कामगार यांचेही ५ महिन्याचे थकित वेतन ,७ महिन्याचा ओव्हरटाईम ची रक्कम थकीत आहे.सदर थकीत बिले अनेकदा कंपनी प्रशासनाकडे मागणी केली मात्र त्यांनी जाणीवूर्वक टाळाटाळ केल्याने मा. जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे दि.२६ डिसेंबर २०२३ पासून बेमुदत आंदोलन केल्यावर मा.जिल्हाधिकारी बीड यांनी दिलेल्या निर्देशानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, व्यंकटेश्वरा इंडस्ट्रीयल सर्विसेस , परळी यांनी




दि.१५ फेब्रुवारी २०२४ पर्यंत थकित असलेली सर्व रक्कम देण्यात येईल असे लेखी आश्वासन दिले होते.मात्र सदर मुदत संपली तरी ऊस उत्पादक शेतकरी व साखर कामगार यांचे थकित असलेले कोट्यावधी रुपये अद्यापही दिले नाहीत परिणामी ऊस उत्पादक शेतकरी व साखर कामगारांचे कुटुंब उघड्यावर आले असून सदर थकित बिले मिळविण्यासाठी लोकशाही मार्गाने दिनांक १ मार्च २०२४पासून बीडचे पालकमंत्री तथा महाराष्ट्राचे कृषिमंत्री मा.ना. धनंजय मुंडे साहेब यांचे परळी येथील घरासमोर बेमुदत धरणे आंदोलन ऊस उत्पादक शेतकरी व साखर कामगार सुरू करणार आहेत.तरी मे. प्रशासनास व कंपनीस विनंती की सदर थकित बिले तात्काळ देण्यात यावी. या आंदोलनाची प्रशासकीय नोंद घेऊन तात्काळ न्यायीक कारवाई करावी तसेच आंदोलनादरम्यान उद्भवणाऱ्या कायदा व सुव्यवस्थेची संपूर्ण जबाबदारी जिल्हा प्रशासन व व्यंकटेश्वरा इंडस्ट्रियल सर्व्हिसेस या कंपनीची राहील असेही दिलेल्या निवेदनात म्हटले आहे . सदरील निवेदनाच्या प्रति मा. पोलीस अधिक्षक साहेब,बीड ,मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, व्यंकटेश्वरा इंडस्ट्रीयल सर्विसेस प्रा.ली. परळी .मा. पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे, परळी शहर/ संभाजी नगर,/ परळी ग्रामीण यांना देण्यात आलेल्या आहेत.

# श्री विश्वकर्मा मंदिर एन-६ येथे विश्वकर्मा जयंती उत्साहात साजरी

**छत्रपती संभाजीनगर** –विश्व निर्माता, विश्वआर्किटेक, शिल्पकार श्री विराट प्रभु विश्वकर्मा यांची जयंती सिडको एन ६, येथील श्री गणेश विश्वकर्मा मंदिरामध्ये अत्यंत भक्ती भावानेने व पेढे वाटून उत्साहाने साजरी करण्यात आली.

सकाळी सात वाजता महाभिषेक आठ वाजता सत्यनारायण महापूजा व प्रसाद, भजनाचा कार्यक्रम झाल्यानंतर रेड स्वस्तिक ग्रुप भगवान राऊत यांनी आरोग्य तपासणी शिबिर त्या शिबिरात १०० पेक्षा जास्त लोकांनी लाभ घेतला यानंतर मान्यवरांची मार्गदर्शनपर भाषणे झाली यामध्ये विश्वकर्मा मंदिराचे संस्थापक अध्यक्ष संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अशोक पगार यांनी समाजाचे प्रश्न मांडले या ठिकाणी मंदिराची जागा असून या ठिकाणी सभागृह चे बांधकाम करून देण्यात यावे व समाजाचे माणूस नगरसेवक व्हा व ओबीसीचे आरक्षण ओबीसी जनगणना व्हावी ही मागणी केली.माजी महापौर नंदकुमार घोडेले, हायकोर्ट वकील महादेव आंधळे, अंबादास रगडे हनुमंतराव कदम पुणे




आदींची भाषणे झाली. याप्रसंगी आपले विचार प्रकट करताना फुले शाहू आंबेडकरांची परंपरा ही आपली परंपरा आहे आपले संस्कृती ज्ञानेश्वर तुकाराम महाराज बागेश्वर धाम किंवा उत्तरेकडील महाराज हे आपली संस्कृती नाही,आपल्याला अजून सामाजिक भान आलेले नाही सामाजिक भान ठेवून ओबीसींनी आपला लढा लढला पाहिजे असे उद्गार प्रल्हाद लुलेकर यांनी याप्रसंगी काढले. यावेळी समाजातील महिला एमबीबीएस डॉक्टर झाली मानसी नारायण वाघ विश्वकर्मा जयंती निमित्त सत्कार करण्यात आला.श्री विश्वकर्मा जयंती महोत्सव साजरा करण्यासाठी समाज कार्यकर्ते राजू सालपे, बबनराव पवार, उद्धवराव थोराईत, बाळकृष्ण क्षीरसागर, सुभाष पवार, सिताराम सपकाळ, विलास चंदने, मोहन बोरडे, गोपाळ राऊत ,ज्ञानेश्वर शिरसाट , समाधान जाधव ,किरण सल्फे , वैभव सालपे , स्वप्निल शिरसाट , बाळासाहेब चंदनचे , रमेश पगार , मोहन सपकाळ , सिताराम राजगुरू, शोभा सोनवणे कलावती पगारे , मंदाकिनी पवार , निर्मला सालपे , साधना जाधव , सुनिता पवार , राम पवार , कांताबाई सपकाळ , अश्विनी शिरसाट , स्वाती सपकाळ आदी साह समाज बांधवांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजू सालपे यांनी तर आभार प्रदर्शन बबनराव पवार यांनी केले. महाप्रसादाने श्री विश्वकर्मा जयंती महोत्सवाची सांगता करण्यात आली

# १५ जानेवारी पर्यंतची उस बिले अदा-अध्यक्ष शिवानंद पाटील

**मंगळवेढा :** साखर उताऱ्यामध्ये तालुक्यात आघाडीवर असलेल्या असलेल्या श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्यास गाळपास दिलेल्या ऊस उत्पादकाचे १५ जानेवारी पर्यंतचे देयक २७०१ प्रमाणे बँक खात्यावर जमा करण्यात आल्याची माहिती अध्यक्ष शिवानंद पाटील यांनी दिली याप्रसंगी उपाध्यक्ष तानाजी खरात,संचालक मुरलीधर दत्तू, गौरीशंकर बुरकूल, गोपाळ भगरे, राजेंद्र चरणुकाका पाटील, भारत बेदरे, दयानंद सोनगे, औदुंबर वाडदेकर, रेवणसिध्द् लिगाडे, भिवा दोलतडे, बसवराज पाटील, गौडाप्पा बिराजदार, दिगंबर भाकरे, महादेव लुगडे, तानाजी कांबळे, तानाजी काकडे, सुरेश कोळेकर, प्र।कार्यकारी संचालक रमेश जायभाय सह सर्व खातेप्रमुख उपस्थित होते.अधिक माहिती देताना अध्यक्ष पाटील म्हणाले की चालु हंगामात दामाजी कारखान्याने आजअखेर एकूण ३,४६,४६४ मे।टन गाळप केले असून एकूण ३,४९,३८० क्विंटल साखर पोत्याचे उत्पादन करून सरासरी साखर उतारा १०.१४ मिळाला.चालु गळीत हंगाम अंतीम टप्प्यात आला असून कार्यक्षेत्रातील सभासद व शेतकऱ्यांचा संपुर्ण ऊस गाळप केल्याशिवाय दामाजी कारखान्याचा हंगाम बंद करणार नाही.शिवाय सदरचे बिल



शेतकय्राचे सोयीनुसार धनश्री पतसंस्थेच्या सर्व शाखा, जिजामाता पतसंस्था मंगळवेढा, रतनचंद शहा सह।बँक-मंगळवेढा इत्यादी संबंधीत बँकां/ पतसंस्थामधील खात्यामध्ये वर्ग केले तर १६ ते ३१ जानेवारी २४ चे ऊस तोडणी वाहतुक बिले संबंधीत बँका,पतसंस्थातील ठेकेदारांचे नांवावर यापुर्वीच वर्ग केले. पतसंस्थेकडून शेतकरी ठेकेदारांचे खातेवर रक्कम वर्ग होणेसाठी दोन दिवसाचा वेळ सोडून कारखान्याचे शेती विभागाकडील कर्मचाऱ्यांकडून ऊस बिलाची पावती घेवून संबंधीत बँकेतून ऊस बिलाची रक्कम घेवून जावे असे आवाहन अध्यक्ष पाटील यांनी केले.

# सोलापूर जिल्ह्यातील ‘शासन आपल्या दारी’ पुन्हा लांबणीवर;१२ महिन्यांपासून लाभार्थी ‘वेट ॲण्ड वॉच’वर

**सोलापूर :** ‘शासन आपल्या दारी’चा सोलापूर जिल्ह्यातील कार्यक्रम आता दुसऱ्यांदा पुढे ढकलण्यात आला आहे. फेब्रुवारी २०२३मध्ये पंढरपुरात हा कार्यक्रम नियोजित होता, पण त्यावेळी तो झाला नाही. आता लोकसभेच्या आचारसंहितेपूर्वी हा कार्यक्रम घेण्याची घाई सरकार पातळीवरून सुरू आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने त्यादृष्टीने सर्वच विभागांना पंढरपूरला येणाऱ्या लाभार्थींची यादी निश्चित करण्याचे आदेश दिले. पण, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या तारखा उपलब्ध नसल्याने हा कार्यक्रम पुन्हा लांबणीवर पडला असून लाभार्थींना आणखी काही दिवसांची वाट पाहावी लागणार आहे.संजय गांधी निराधार योजनेसह विविध योजनांसाठी पात्र ३५ हजार लाभार्थींना एकत्रित करून बसगाड्यातून त्यांना पंढरपुरात नेले जाणार आहे. ‘शासन आपल्या दारी’ उपक्रमासाठी जाणाऱ्या लाभार्थींना त्याठिकाणी चहा, नाष्टा, जेवणाची सोय केली जाणार असून त्यांना त्याठिकाणी नेण्यासाठी व पुन्हा घरी आणण्यासाठी एसटी महामंडळाच्या ४५० बसगाड्यांची सोय केली जाणार आहे. लोकसभा निवडणुकीपूर्वी सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर येथे हा कार्यक्रम घेण्याचे नियोजन मागील वर्षभरापासून सुरू आहे. पण, या कार्यक्रमाला मुहूर्त अद्याप लागलेला नाही. फेब्रुवारी २०२३ मध्ये हा कार्यक्रम होणार होता, त्यामुळे खर्चाची संपूर्ण तयारी जिल्हा प्रशासनाने केली होती.

पण, काही कारणास्तव हा कार्यक्रम होवू शकला नाही.आता लोकसभेची आचारसंहिता मार्चच्या पहिल्या आठवड्यात जाहीर होईल म्हणून २७ ते २९ फेब्रुवारी दरम्यान हा कार्यक्रम नियोजित होता. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी कार्यक्रमाच्या तयारीसाठी सर्वच विभागप्रमुखांची बैठक देखील घेतली. पण, आता हा कार्यक्रम पुन्हा लांबणीवर पडला असून तो कधी होईल हे निश्चित नसल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.पंढरपूर येथील नियोजित ‘शासन आपल्या दारी’ उपक्रमासाठी जिल्हाभरातून अंदाजे ३५ हजार लाभार्थी त्याठिकाणी नेले जाणार आहेत. त्यासाठी साधारणत: ४५० बसगाड्यांची गरज भासणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने सुरवातीला २७ ते २९ फेब्रुवारी या काळात कधीही बसगाड्या लागतील, असे कळविले होते. त्यानंतर एसटीच्या विभाग नियंत्रकांना ३ मार्च तारीख सांगण्यात आली. आता ७ मार्चपर्यंत कार्यक्रम होवू शकतो, असे सांगण्यात आले आहे. दरम्यान, या कार्यक्रमासाठी एसटी महामंडळाला बसगाड्यांच्या भाड्यापोटी अंदाजे सव्वाकोटी रुपयांचे भाडे (एका गाडीसाठी २५ हजार रुपये) द्यावे लागणार आहे.

# संविधानाच्या रक्षणासाठी बहुजन समाजाने एकत्रीत यावे-आमदार प्रतिभा धानोरकर

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

सध्या देशातली परिस्थिती अत्यंत भयावह असुन केंद्रातील सरकार हे शेतकरी विरोधी असल्याचे दिसून येत आहे. अनेक ई डी, सीबीआय सारख्या स्वायत्त संस्थांना हाताशी धरुन विरोधी पक्षांना कमकुवत करुन आपला राजकीय स्वार्थ साधत असल्याचे चित्र देशात निर्माण झाले आहे. राज्यातील व केंद्रातील सरकार हे समाजा समाजात द्वेष निर्माण करुन लोकशाहीचा अपमान करीत आहे. त्यामुळे आज संविधानाच्या रक्षणासाठी बहुजन समाजाने एकत्रीत येणे गरजेचे असल्याचे मत आमदार प्रतिभा धानोरकर यांनी बहुजन विचार मंच द्वारा आयोजित 'लढा विचारांचा-सन्मान संविधानाचा' या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले.

बहुजन विचार मंच चंद्रपूर द्वारा आयोजित 'लढा विचारांचा-सन्मान संविधानाचा' या कार्यक्रमाचे आयोजन चंद्रपूर शहर महानगरपालिकेचे पटांगणावर करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी महात्मा ज्योतीबा फुले लिखित तृतीयरत्न या नाटकाचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी प्रतिभा धानोरकर उद्घाटन प्रसंगी म्हणाल्या कि, आजची राजकीय परिस्थिती भयावह असून देश हुकुमशाही कडे वळत आहे. आपल्याला आज संविधान रक्षणाची गरज असुन त्यासाठी बहुजन समाजाने एकत्रीत येणे गरजेचे आहे. त्यामुळे लोकशाही बळकट होईल. तीन दिवस चालणाऱ्या या कार्यक्रमाने बहुजन समाजाचा वारसा जोपासला जाऊन कला व गीतांमधून प्रबोधन होणार आहे तसेच डॉ. विश्वंभर चौधरी यांच्या माध्यमातून देशातील राजकीय परिस्थितीचा आढावा घेतला जाणार असल्याचे मत देखील यावेळी आमदार प्रतिभा धानोरकर यांनी व्यक्त केले. तीन दिवस चालणाऱ्या या कार्यक्रमाला चंद्रपूरकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाचे आस्वाद घेण्याचे आव्हान करण्यात आले. यावेळी चंद्रपूरातील विविध समाजातील प्रतिनिधीत्व करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार देखील आमदार महोदयांच्या हस्ते करण्यात आला.उद्घाटन प्रसंगी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रा. सूर्यकांत खनके हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून अनिरुध्द वनकर यांच्यासह विनोद दत्तात्रय, रितेश तिवारी, नम्रता ठेमस्कर, चंदा वैरागडे, अनिल नरुले, संगीता अमृतकर, अश्विनी खोब्रागडे, बापू अन्सारी, सकिना अन्सारी, विना खनके, रमजान अली, अनुताई दहेगांवकर, शालिनी भगत, सचिन राजुरकर यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे संचालन गोपाल अमृतकर यांनी केले तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ॲड. प्रितिशा साधना, राहुल सुर्यवंशी, रामचंद्र कोंद्रा, स्वप्नील शेंडे, मोनु रामटेके, श्याम राजुरकर यांनी विशेष प्रयत्न केले.



# चंद्रपूर जिल्हा भारतीय जनता पार्टी अनुसूचित जमाती (एस.टी.) आघाडी ग्रामीण जिल्हा कार्यकारिणी जाहिर

## भारतीय जनता पार्टी अनुसूचित जमाती (एस.टी.) आघाडी ग्रामीण जिल्हाध्यक्ष अरूण आनंदराव मडावी यांनी केली घोषणा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी अनुसूचित जमाती (एस.टी.) आघाडी ग्रामीण जिल्हाध्यक्ष अरूण आनंदराव मडावी यांनी नवनियुक्त चंद्रपूर जिल्हा भारतीय जनता पार्टी अनुसूचित जमाती (एस.टी) आघाडी ग्रामीण कार्यकारिणीची नावे जाहीर केली आहे. यामध्ये सरचिटणीस, उपाध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष ,प्रसिद्धी प्रमुख व सदस्य यांचा समावेश आहे.

भारतीय जनता पार्टी अनुसूचित जमाती (एस.टी.) आघाडी ग्रामीणच्या सरचिटणीसपदी अभय गणपतराव मडावी, अशोक मंगरूजी आलाम, जगदिश हरि शेडमाके यांची निवड करण्यात आली. भारतीय जनता पार्टी अनुसूचित जमाती (एस.टी.) आघाडी ग्रामीणच्या उपाध्यक्षपदी निलेश विठ्ठल आडे, ल प्रमोद छत्रपती कोडापे, अनिल कुमरे, भारती अमोल गोडे, पुजा खडसंगे, वर्षा परचाके, विठ्ठल उईके, दत्तु कोरवते, रामकुमार शेडमाके, ज्योती वाकळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संजय हरी टेकामहे कोषाध्यक्ष असतील.रंजना मडावी,रंजना दडमल,संजय विठ्ठल मेश्राम, मनोज तुमराम, सुरज कैलास मेश्राम , रमेश मेश्राम , शंकर मडावी, देवराव टेकाम , अनिल मारोतराव कुमरे, उमेश पेन्दोर, अरुणा चंद्रशेखर नन्नावरे, हे सचिव असतील. विकास शेडमाके यांच्याकडे प्रसिद्धी प्रमुखाची जबाबदारी देण्यात आली आहे.वर्षा परचाके, नरेश कोडापे,चंद्रभान किन्नाके, रामदास कुमरे ,जिवेश सोयाम,बंडु गेडाम, गजानन कुडधे,विठ्ठल कुमरे, शंकर किन्नाके,मारोती उईके,अनिल कुमरे,भिमा दादाजी मडावी, प्रमोद तोडासे, गजानन मडावी,अनिल मारोतराव मडावी, वैभव सिडाम , राकेश राजु सराते , विशाल किसनजी सिडाम , प्रविण नामदेव मडावी,शैलेश शालीक मडावी, वामनराव किन्नाके, गोपाळा अरके, शुभम उईके, नंदकिशोर उईके, प्रकाश मेश्राम,प्रफुल उईके, लिलाधर येरमे,वैशाली वाळके, उमेश पेन्दोर,नयनेश आत्राम, ज्योतीराम कोयचाळे,भाऊराव कुळमेथे,तिरूपती किन्नाके, आशाताई मेश्राम, वर्षा अशोक धारणे, रंजु दडमल,अरूणा नन्नावरे,मनिषा घराटे,गिता टोने, ममता गायकवाड, नलु धारणे , गीता जांभुळे , सुलोचना कुमरे यांची सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली.नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे महाराष्ट्राचे वन व सांस्कृतिक कार्य तथा मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, केंद्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा माजी केंद्रीय गृहराज्य मंत्री हंसराज अहीर, भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा , आमदार कीर्तीकुमार भांगडीया , आमदार रामदास आंबटकर , भाजपाचे ज्येष्ठ नेते चंदनसिंह चंदेल , माजी आमदार प्रा. अतुल देशकर , ड.संजय धोटे, माजी जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे, महानगराचे जिल्हाध्यक्ष राहुल पावडे , विद्या देवाडकर प्रदेश भाजपा चिटणीस , प्रदेश महिला मोर्चा सरचिटणीस अल्का आत्राम,माजी आमदार जैनुद्दीन जव्हेरी , सुदर्शन निमकर , भाजपा नेते अशोक जिवतोडे जिल्हा महामंत्री डॉक्टर मंगेश गुलवाडे , संध्या गुरूनुले , ब्रिजभूषण पाझारे, राजू गायकवाड,विवेक बोडे, भाजपा ज्येष्ठ नेते विजय राऊत , प्रमोद कडू, खुशाल बोंडे , राजेंद्र गांधी, रमेश राजूरकर , संजय गजपुरे , नामदेव डाहुले , अनिल डोंगरे, आशिष देवतळे, अरुण मडावी, महेश देवकाते, वंदना शेंडे, गौतम निमगडे, डॉ.अंकुश आगलावे, बंडू गौरकार , इमरान पठाण आदींनी अभिनंदन केले आहे.

# महिला बचत गटांतर्फे उत्पादित वस्तूंची प्रदर्शनी भावी महिला उद्योजकांसाठी मोठे मंच-आ.जोरगेवार

## महिला बचत गटांतर्फे उत्पादित वस्तूंची प्रदर्शनी;आ. जोरगेवार यांच्या हस्ते उद्घाटन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महिला सक्षमीकरणासाठी केंद्र राज्य शासनामार्फत विविध योजना राबविण्यात येत आहेत. या योजना अधिक लोकाभिमुख करून महिलांना संघटित करून, प्रशिक्षण देऊन, आर्थिक सक्षमीकरण करणे, महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजना एकत्रितपणे एकाच छत्राखाली राबविण्यात यावेत यासाठी या योजना अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. खुशिया लोकसंचालित साधन केंद्राच्या वतीने महिला बचत गटांतर्फे उत्पादीत वस्तूची प्रदर्शनी ही भावी महिला उद्योजगांसाठी मोठे मंच असल्याचे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.



मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान महिला व बालविकास विभाग महिला आर्थिक विकास महामंडळ जिल्हा कार्यालय चंद्रपूर द्वारा संचालित खुशिया लोकसंचालित साधन केंद्राच्या वतीने ग्रामीण महिला बचत गटातर्फे उत्पादीत वस्तूची प्रदर्शनी चे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी जिल्हा समन्वयक अधिकारी प्रदिप काढोळे, यंग चांदा ब्रिगेडच्या महिला शहर संघटिका वंदना हातगावकर, युवा नेते अमोल शेंडे, अल्पसंख्याक विभागाचे युथ शहर अध्यक्ष राशिद हुसेन, सायली येरणे, दुर्गा वैरागडे, आदिवासी विभागाचे जिल्हाध्यक्ष जितेश कुळमेथे, विश्वजीत शहा, उज्वला वरखडे, शारदा हुसे, नरेंद्र बनकर, राजकुमार बनकर, रुपेश शेंडे, आदी मान्यवरांची मंचावर उपस्थिती होती.

यावेळी पूढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले कि, मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान राज्यातील महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी राबविल्या जात असलेली योजना आहे. महिलांमध्ये आत्मविश्वास वाढवून त्यांचा उद्योजकीय विकास घडवून आणणे, त्यांना सातत्याने रोजगाराच्या संधी आणि बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचे काम सदर योजनेच्या माध्यमातुन केल्या जात आहे. महिलांमध्ये कल्पकता असते. महिला सशक्तीकरण करण्याचे आमचेही प्रयत्न सुरु आहे. महिलांना स्वयं रोजगारातुन आर्थिक प्रगती करता यावी या करिता यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने महिलांना निःशुल्क शिवणकाम प्रशिक्षण दिल्या जात असल्याचे यावेळी ते म्हणाले. ब्युटी पार्लर आणि मेकअप सारखे महागडे प्रशिक्षण आपण महिलांना निशुल्क उपलब्ध करुन देत आहोत. पाच हजार महिलांना प्रशिक्षीत करण्याचा संकल्प आपण केला असल्याचे ते यावेळी म्हणाले. या कार्यक्रमाला बचत गटाच्या महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# आनंद निकेतन कृषी महाविद्यालयात 'कृषीगंध २०२४' वार्षिक महोत्सव उत्साहात साजरा

**आनंदवन । प्रतिनिधी**

आनंद निकेतन कृषी महाविद्यालयाचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा कृषीगंध - २०२४ दि. १६ ते २० फेब्रुवारी दरम्यान उत्साहात साजरा झाला. 'कृषीगंध: द इसेन्स ऑफ लाइफ' या धर्तीवर साजरा करण्यात आलेल्या या पाच दिवसीय सोहळ्यामध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा या अनुषंगाने त्यांना वेगवेगळ्या क्रीडा-स्पर्धांचे तसेच सांस्कृतिक कार्यक्रमाबरोबर पारितोषिक वितरणाचे आयोजन देखील करण्यात आले होते.



दि. १८ व १९ रोजी विद्यार्थ्यांसाठी सांस्कृतिक कलाविष्काराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या पारितोषिक वितरणाच्या प्रसंगी दि. २० रोजी प्रमुख पाहुणे म्हणून कुसलकर, प्रकल्प उपसंचालक, आत्मा, चंद्रपूर हे उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी कृषी विभाग आणि त्यामध्ये चालणारी कार्यप्रणाली यावर सविस्तर माहिती सांगितली, त्याबरोबरच स्पर्धापरीक्षेच्या माध्यमातून कृषी विभागात सेवेची संधी यावर माहिती दिली.

यावेळी डॉ. सुहास पोतदार, प्राचार्य अनिकृम वरोरा यांनी महाविद्यालयाच्या वार्षिक वाटचालीचे विवेचन मांडले तसेच गतवर्षातल्या स्पर्धापरीक्षेत व विद्यापीठ स्तरावरील विशेष प्राविण्य प्राप्त गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. वेगवेगळ्या मैदानी स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमात विशेष कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. दुपारी विद्यार्थी-शिक्षकजणांसाठी प्रीतीभोजनाच्या आयोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली. या पाच दिवसीय कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# २५ फेब्रुवारी रोजी जिल्हा औषधी भांडार नवीन इमारतीचे लोकार्पण

**चंद्रपूर**-राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभागाच्या जिल्हा औषधी भांडार नवीन इमारतीचे तसेच तडाली (ता. चंद्रपूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील अधिकारी कर्मचा-यांच्या नवीन वसाहतीचे लोकार्पण रविवार दि. २५ फेब्रुवारी २०२४ रोजी सायंकाळी ४ वाजता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन पध्दतीने होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार उपस्थित राहतील.

दि. २५ फेब्रुवारी २०२४ रोजी राजकोट येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते देशातील पाच एम्सचे लोकापर्ण करण्यात येणार आहे. यावेळी राष्ट्रीय आरोग्य अभियान व प्रधानमंत्री आयुष्मान भारत हेल्थ इन्फ्रास्ट्रक्चर अभियानांतर्गत विविध कामांचे डीजीटल पध्दतीने लोकार्पण व भुमिपूजन करण्यात येणार आहे. या अंतर्गत चंद्रपूर जिल्ह्यातील जिल्हा औषध भांडार, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नवीन इमारत जवळ, चंद्रपूर तसेच तडाली येथील अधिकारी कर्मचारी नवीन वसाहतीचे लोकार्पण करण्यात येणार आहे

# पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यातून ९६ उमेदवारांची निवड

**चंद्रपूर**-जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, चंद्रपूर व मॉडल करिअर सेंटर आणि शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था वरोरा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पंडीत दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यात ९६ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली.शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था वरोरा, येथे पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला. आनंद निकेतन महाविद्यालयचे प्राचार्य मृणाल काळे हे उदघाटक म्हणून तर औदयोगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य भालचंद्र रासेकर हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. जास्तीत जास्त उमेदवारांनी या मेळाव्याचा लाभ घ्यावा तसेच आपल्या कौशल्याचा वापर रोजगार/स्वंयरोजगार मिळविण्यासाठी करावा तसेच उद्योजकांनी रोजगार उपलब्ध करून दयावा, याबाबत मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त भैयाजी येरमे यांनी सुद्धा सर्वसमावेशक मार्गदर्शन केले. तसेच आपल्या कौशल्याचा वापर रोजगार मिळविण्यासाठी करावा. उमेदवारांनी नोकरीसाठी बाहेर जाण्याची मानसिकता ठेवावी याबाबत मार्गदर्शन केले.कार्यक्रमाला व्ही-१ क्लीक सोल्युशन, चंद्रपूर, भारत पे प्रा.लि. चंद्रपूर, नवकिसान बायोटेक प्रा.ली. नागपूर, स्पंदन स्पुर्ती फायनन्स लि. चंद्रपुर , जय महाराष्ट्र प्लेसमेंन्ट सर्व्हिसेस प्रा. लि. चंद्रपुर , एल आय सी चंद्रपुर, अशपा ग्लोबल सर्व्हिसेस प्रा.लि. इ. कंपन्यांचा सहभाग होता. सदर मेळाव्यात उमेदवार बहुसंख्येने उपस्थित होते. या रोजगार मेळाव्यात ३६८ पेक्षा जास्त उमेदवार होते. त्यापैकी ९६ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली.सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक समन्वयक मुकेश मुंजनकर यांनी केले. संचालन विकास देशमुख व शीतल सुसतकर यांनी तर आभार श्री. खिरटकर यांनी मानले. कार्यक्रमाला जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्राचे गजानन घोसे, श्रीकांत किरनाके, मुकेश मुजनकर व औदयोगिक प्रशिक्षण संस्था, वरोरा यांचे कर्मचारी उपस्थित होते.

# शांत,सुस्वभावी,संयमी, मार्गदर्शक नेतृत्व राज्याने गमावल-आ.जोरगेवार

**चंद्रपूर**-राज्याचे माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांच्या निधणाची वार्ता दुखत आहे. त्यांनी महाराष्ट्राचे नेतृत्व केले. त्यांच्या वागण्यात नेहमी साधेपणा असायचा. त्यांच्या जाण्याने राज्याने शांत,सुस्वभावी,संयमी आणि मार्गदर्शक नेतृत्व कायमच गामावल असल्याचे भावना आमदार किशोर जोरगेवार यांनी दिलेल्या शोकसंदेशातून व्यक्त केली आहे.मि शिवसेना पक्षात काम केले आहे. त्यावेळी शिवसेना प्रमूख बाळासाहेब ठाकरे यांच्या नंतर मनोहर जोशी हेच शिवसेनेच्या कार्यकर्त्यांसाठी सर्वपरिचीत होते. ते कार्यकर्त्यांसाठी सहज उपलब्ध असायचे. त्यांनी शुन्यातून विश्व निर्माण केले. त्यामुळे त्यांना गरिबीची जाण होती.ते मुख्यमंत्री होण्याच्या अगोदर चंद्रपूर येथे आले होते. शिवसेनेत काम करत असतांना अनेकदा त्यांना भेटण्याचा योग आला. यावेळी अनेकदा चर्चा व्हायची. शिव सैनिकांप्रती त्यांच्यात तळमळ होती. त्यांच्या जाण्याने राजकारण आणि समाजकारणाची मोठी हानी झाली आहे. असे नेते पून्हा घडणे शक्य नाही असे आपल्या शोकसंदेशात आमदार किशोर जोरगेवार यांनी म्हटले आहे.

# गोंडपिपरी नगरपंचायत विषय समितीचे तिनही सभापती बिनविरोध

**गोंडपिपरी । सुरज माडूरवार**

नगरपंचायत गोंडपिपरीच्या तीन विषय समिती सभातींची गुरुवारी (दि २२) बिनविरोध निवड झाली.पीठासन अधिकारी म्हणून तहसीलदार शुभम बहाकर, मुख्यधिकारी जाधव यांनी काम पाहिले.सभापतींचा कार्यकाळ एक वर्षाचा असतो.त्यांचा कार्यकाळ संपल्याने गुरुवारी सभा झाली.सभेत शिवसेना(उबाठाचे) यादव बांबोडे यांची स्वच्छता व आरोग्य, काँग्रेसच्या रंजना रामगिरकर बांधकाम,काँग्रेसच्या वनिता वाघाडे बालकल्याण समितीचे सभापती पद देण्यात आले.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .